अस्सल सोलापुरी

# सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## १८ जुलैला सोलापूरचे शिष्टमंडळ नागरी उड्डाण मंत्र्यांना भेटणार

### विमानसेवा चालू करण्याच्या हालचाली

✔ **सोलापूर :** होटगी रोड विमानतळावरून नागरी विमान सेवा सुरू करण्यासंदर्भात खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत १८ जुलै रोजी सोलापुरातील शिष्टमंडळ नागरी उड्डाण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांची भेट घेणार आहे.

या संदर्भात सोमवारी होटगी रोड विमानतळ येथे खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीस भुमी अभिलेख अधिकारी घोडके, उत्तरचे तहसीलदार सैफन नदाफ, सोलापूर महानगरपालिका मालमत्ता विभागाचे संतोष गाडेकर, विमानतळ व्यवस्थापक बनोथ चांपला, डॉ. शिरीष वळसंगकर आदी उपस्थित होते. या बैठकीत विमानतळ सुरक्षा, फायर फायटिंग सिस्टीम, स्वच्छता या विषयाबरोबरच विमानतळ जागेच्या सातबारावर, शेतकरी व श्री सिद्धेश्वर सहकारी कारखानाची नावे कमी करून सातबारा विमान प्राधिकरणाच्या नावे करण्यासंदर्भात चर्चा झाली.



होटगी रोड विमानतळावरून नागरी विमान सेवा सुरू करण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी १८ जुलै रोजी सोलापुरातील शिष्टमंडळास नागरी उड्डाण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी वेळ दिली आहे. दिल्ली येथे होणाऱ्या या भेटीदरम्यान होटगी रोड विमानतळावरून विमानतळ सुरू करण्यासंदर्भात येणाऱ्या अडचणी संदर्भात सविस्तर चर्चा होणार आहे. या अडचणी दूर करून विमानसेवा सुरू करण्याबाबत विनंती करण्यात येणार असल्याचे स्पष्टीकरण महसूल प्रशासनाच्या वतीने देण्यात आले आहे.

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. ११ जुलै २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : २८२ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# कॅबिनेट विस्ताराचा उडणार 'बार' आठ मंत्र्यांना 'नारळ' मिळणार


✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राज्यात गेल्या काही महिन्यांपासून चर्चेचा विषय ठरलेल्या मंत्रिमंडळाच्या विस्ताराचा 'बार' याच आठवड्यात उडणार आहे. भाजपसह शिवसेनेतील १४ आमदारांना मंत्रिपदाची लॉटरी लागणार असून त्याचबरोबर दोनही पक्षांमधील प्रत्येकी चार याप्रमाणे आठ मंत्र्यांना डच्चू दिला जाणार असल्याचे वृत्त आहे. सोमवार दि.१७ जुलैला विधी मंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला आरंभ होणार आहे. त्याच्या आत विस्तार करण्याची गरज असून उपमुख्यमंत्री अजितदादांसह त्यांच्या शिलेदारांचे खाते वाटपही जाहीर करावे लागणार आहे. मंत्रिपद मिळावे म्हणून भाजप-शिवसेनेतील इच्छुक आमदार मुंबईत तळ ठोकून आहेत तर आपले मंत्रिपद शाबूत रहावे म्हणून काही जण देवाकडे प्रार्थना करत बसले आहेत. दरम्यान शिवसेनेतील ४ मंत्र्यांना नारळ देण्याबाबत भाजपने मोठा दबाव आणल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापुढे मोठे धर्मसंकट उभे ठाकले आहे.**

गेल्या आठवड्यात राज्याच्या सत्तेत मोठी उलथापालथ झाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार हे आपल्या लवाजाम्यासह शिंदे-भाजप सरकारमध्ये सामील झाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ९ आमदारांनी मंत्री पदाची शपथ घेतली. त्यानंतर आता मंत्रिमंडळाचा विस्तार होणार नाही, असे संकेत होते परंतु आगामी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका पाहता भाजप व शिवसेनेतील आमदारांनी मंत्रिपदाचा हट्ट धरल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अखेर मंत्रिमंडळ विस्ताराची 'कळ' दाबावी लागणार आहे. विस्तार आणि पवार गटाच्या मंत्र्यांचे खातेवाटप शनिवारपर्यंत

## चौदा आमदारांना 'लॉटरी' लागणार

केव्हाही होऊ शकते. शिंदेंच्या शिवसेनेतील चार ते पाच आमदारांना आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागणार आहे. त्यासाठी भाजपचे पहिल्यापासूनच दबावतंत्र




मंत्रिमंडळाच्या विस्तारातून डच्चू देण्याची चिन्हे दिसत आहेत.त्यामुळे शिंदेपुढे पेच वाढला आहे. शिंदे यांच्यासोबत आलेल्या ४० आमदारांमध्ये

सुरू आहे. यात मराठवाड्यातील मंत्र्यांचा कामावर केंद्रातील नेते नाराज असल्याची माहिती मिळत आहे. या नेत्यांना होणाऱ्या मंत्रीपदावरवरुन रस्सीखेच चालू आहे. त्यातील काही आमदार उद्धव ठाकरे यांच्या संपर्कात असल्याने शिंदेंची डोकेदुखी आणखी वाढली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस सरकारमध्ये सामील होण्यापूर्वी शिंदे आमदारांना १२ ते १३ मंत्रिपद आणि महामंडळ भेटण्याची शक्यता होती. मात्र, ही शक्यता देखील आत्ता धूसर झालेली आहे, हे आमदारांना कळून चुकले आहे. त्यामुळे एकनाथ शिंदेचा गटात मोठ्या प्रमाणात नाराजी दिसत आहे.

### म्हणून रखडले खातेवाटप...

अजित पवारांबरोबर आठ मंत्र्यांनी शपथ घेतली. मात्र, अजून खातेवाटप होऊ शकले नाही. भाजपच्या दिल्लीतील नेत्यांच्या निर्णयाअभावी खातेवाटप रखडल्याचे सांगण्यात येते. खरेतर शपथ घेतल्यानंतर २४ तासात खातेवाटप करण्याची परंपरा आहे. अजित पवार, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे असे टोलेजंग नेते आठ दिवस झाले तरी खात्याच्या प्रतिक्षेत आहेत. यावरुन विरोधक त्यांना बिनखात्याचे मंत्री म्हणून हिणवत आहेत. मात्र, शिवसेनेच्या विद्यमान चार मंत्र्यांना डच्चू मिळाल्यास शिंदे गटात त्याचे काय पडसाद उमटणार आणि एकनाथ शिंदे पुढे काय भूमिका घेणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### गोंधळात गोंधळ...!

विस्तार आणि खातेवाटपावरून दिल्लीच्या भाजप नेत्यांमध्ये गोंधळात गोंधळ सुरू असल्याचे समजते. भाजपच्या दृष्टीने आगामी लोकसभा निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे ज्या मंत्र्यांकडून अपेक्षित कारभार होत नाही, अशा मंत्र्यांना विस्तारामध्ये वगळण्याचा केंद्रातील नेतृत्व गांभीर्याने विचार करीत आहे. याशिवाय भाजपमधील इतरांना अधिकाधिक संधी देण्याचाही यामागे विचार असल्याचे कळते. ज्यांना डच्चू मिळणार आहे, त्यामध्ये मुंबईतील एक, उत्तर महाराष्ट्रातील एक, पश्चिम महाराष्ट्रातील दोन मंत्र्याचा समावेश असल्याचे कळते. डच्चू दिल्याने पक्षाच्या प्रतिमेत सुधारणा होईल की नाही? याचा अंदाज घेण्याचे काम सध्या सुरू असल्याचे सांगण्यात येते.


## पोखरापुरात काढणीस आलेल्या २ लाखांच्या डाळिंबाची चोरी

### शेतकऱ्यांमध्ये घबराट

✔ सुराज्य/मोहोळ

पोखरापूर येथे शेतातील काढणीस आलेले २ लाखाचे डाळिंबाचे पीक अज्ञात चोरट्याने रात्रीच्या वेळेस चोरून नेले असल्याची फिर्याद मोहोळ पोलीस ठाण्यामध्ये दाखल करण्यात आली आहे.

ही घटना ९जुलै रोजी रात्री साडेअकरा ते पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास घडली. पोखरापूर तालुका मोहोळ येथील अमृत रामचंद्र पवार हे त्यांच्या मालकीच्या दोन एकर शेतामध्ये अर्धा एकर डाळिंबाचे पीक घेत आहेत. त्यांच्या शेजारी असणारे कुलदीप कुलकर्णी यांचे दोन एकर शेत बटईने करत आहे. त्यामध्येही त्यांनी डाळिंब केले असून त्यांच्या व शेजारी बटईने केलेल्या शेतात डाळिंबाचे पीक काढणीस आले आहे. ९ जुलै रोजी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास ते त्यांच्या शेतामध्ये डाळिंबाच्या पिकाला पाणी देत होते रात्री १ वाजेपर्यंत पाणी देऊन झाल्यानंतर घरी झोपण्यासाठी गेले. पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास त्यांना जाग आल्यानंतर लघुशंकेसाठी घराच्या पाठीमागे असलेल्या डाळिंबाच्या शेतामध्ये ते गेले शेतातील डाळिंबाच्या झाडांना त्यावेळेस त्यांना फळे दिसली नाहीत म्हणून त्याने सगळीकडे पाहणी केली डाळिंबाच्या झाडाला डाळिंबाची काढणीस आलेली फळे दिसली नाही. त्यांच्या डाळिंबाच्या झाडाचे पीक कोणीतरी अज्ञात चोरट्याने तोडून नेले असल्याची त्यांची खात्री झाली त्यामुळे त्यांनी मोहोळ पोलीस ठाण्यामध्ये धाव घेतली. त्यांच्या भगव्या जातीचे ३ ते ४ टन वजनाचे अंदाजे किंमत २ लाख रुपये किंमतीची फळे कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेले असल्यास असल्याची फिर्याद त्यांनी मोहोळ पोलीस ठाण्यामध्ये दाखल केली आहे. याबाबत अज्ञात चोरट्याच्या विरोधात मोहोळ पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे या घटनेचा तपास मोहोळ पोलीस करत आहेत.



## ट्रॅक्टरच्या धडकेने पादचारी तरुण ठार

✔ **सोलापूर :** वेगाने जाणारा ट्रॅक्टर पाठीमागून धडकल्याने २१ वर्षीय तरुण गंभीर जखमी होऊन उपचारापूर्वी मयत झाला. हा अपघात वडाळा (ता.उत्तर सोलापूर) येथे रविवारी दुपारच्या सुमारास घडला. समाधान चंद्रकांत निकम (वय २१ रा. वडाळा)असे मयताचे नाव आहे. तो काल दुपारी दोन वाजेच्या सुमारास गावातून शेताकडे पायी निघाला होता. त्यावेळी पाठीमागून ट्रॅक्टर धडकल्याने तो गंभीर जखमी झाला.

## 'आरटीओ' अधिकाऱ्यांच्या बनावट सह्या; ११ जणांविरूद्ध गुन्हा दाखल

### सोलापुरातील घटना; विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिली फिर्याद




✔ सुराज्य/सोलापूर

वाहन मालक व वाहन मालक प्रतिनिधींनी संगनमत करून खासगी वाहनांवरील बँकांचा कर्जाचा बोजा उतरविणे व दुय्यम नोंदणी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी शासकिय अर्जावर सहायक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे व विजय तिराणकर यांच्या बनावट सह्या केल्या. या प्रकरणी तिराणकर यांनी ११ जणांविरुद्ध विजापूर नाका पोलिसांत फिर्याद दिली आहे.

आरटीओ कार्यालयाजवळ बसून वाहन मालकांची कामे करणाऱ्या एजंटांनी चक्क आरटीओ अधिकाऱ्यांच्याच बनावट स्वाक्षऱ्या केल्याची गंभीर बाब समोर आली आहे. सहायक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी तिराणकर यांच्या फिर्यादीवरून मुस्कान नदीम शेख, परमेश्वर मरगू गाडीवडार, जाविद मन्सुर पठाण, मकवाना संजय बाबुलाल, योगेश्वर सुरेश दळवे, रफिक अल्लाद्दीन फुलारी, इरण्णा भुताळी गायकवाड, भंडारी शिलेषबाबा साहेबलाल, रियाज बेलीफ, रिझवान व अय्याज यांच्याविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. आरटीओ अधिकाऱ्यांनी त्यासंबंधीची सखोल चौकशी केली.त्यात ११ जणांनी २३ जून ते ४ जुलै २०२३ या काळात अशा प्रकारचे गंभीर कृत्य केल्याची बाबसमोर आली.त्यानंतर आरटीओ अधिकाऱ्यांनी विजापूर नाका पोलीस ठाणे गाठले. संशयित सध्या पसार झाले असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण हनपुडे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली त्यांचा शोध सुरू आहे.

### बनावट रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट मिळविण्यासाठी आरटीओ कार्यालयातून घेतले अर्ज

अकरा जणांनी खासगी वाहनांवरील बँकांचा बोजा उतरवून दुय्यम नोंदणी प्रमाणपत्र म्हणजेच बनावट रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट मिळविण्यासाठी आरटीओ कार्यालयातून अर्ज घेतले. त्यावर सहायक उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या बनावट स्वाक्षऱ्या केल्या. अंतिम मान्यतेसाठी ते अर्ज त्याच अधिकाऱ्यांकडे पाठविले. त्यावेळी फिर्यादी विजय तिराणकर यांच्या नजरेत ही बाब पडली. आपण तर त्या अर्जांवर कोणतीही स्वाक्षरी केली नाही, तर या अर्जांवर सह्या केल्या कोणी, याची पडताळणी त्यांनी स्वत: केली. त्यावेळी ११ लोकांनी केलेली बनावटगिरी समोर आली आणि त्यांनी पोलिसांत धाव घेतली.

## फोटोग्राफरने काढली अल्पवयीन मुलीची छेड

✔ सुराज्य/अक्कलकोट

फोटो काढण्यासाठी गावातील फोटो स्टुडिओत १३ वर्षीय अल्पवयीन मुलगी सोमवारी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास गेली असता फोटोग्राफरने छेडछाड करण्याचा उद्देशाने कपडे काढण्यास सांगून फोटो काढल्याची घटना घडली.

अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशनमध्ये भादवी कलम ३५४, ३५४(ब) व बाल लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम ८, १२ प्रमाणे आरोपी लायकअल्ली अल्लीसो नदाफ यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला. पीडित मुलीच्या आईने फिर्याद दिली.

पीडित मुलगी शाळेच्या गणवेशात सोमवारी १० जुलै रोजी सकाळी साडेआठ वा. चे सुमारास गावातील फोटो स्टुडिओ मध्ये फोटो काढण्या करिता गेली असता आरोपी लायकअल्ली अल्लीसो नदाफ याने मुलीस तुझे कपडे काढून फोटो काढून घे



असे म्हणून ड्रेस काढून फोटोचे पैसे तू देऊ नकोस असे म्हणून विनयभंग केला.

घरी सांगितली तर तुला मी सोडणार नाही, असे म्हणून धमकी दिली. तपास पोसई पंडित चव्हाण हे करीत आहेत.

## संतोषनगर येथे विवाहित इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

✔ सुराज्य/सोलापूर

संतोष नगर बाळे येथे राहणाऱ्या नितीन मल्हारी मस्के (वय ३९) या विवाहित इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना रविवारी रात्रीच्या सुमारास उघडकीस आली.



नितीन मस्के याची पत्नी कामावरून काल रात्री आठ वाजेच्या सुमारास घरी परतली. त्यावेळी नितीन याचा मृतदेह घराजवळील पत्रा शेडमधे लाकडीवाशाला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्याला फासातून सोडवून शासकिय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलीसात झाली असून यामाचे कारण समजले नाही.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



स्वयंपाकाला लागतील तेवढे घे पटकन, मी लॉकर बंद करतोय !

कल्याण
570-27-278

मुंबई
456-52-129

## शेतकऱ्यांनो घाबरू नका; 'सिध्देश्वर'चा हंगाम सुरु करण्याचा प्रयत्न : काडादी

✔ सुराज्य/सोलापूर

विमानसेवेत सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याच्या चिमणीचा अडथळा नसताना केवळ ना हरकत' (एनओसी) प्रमाणपत्र नसल्याचे कारण दाखवून महापालिकेने गेल्या महिन्यात कारखान्याची चिमणी पाडली. आता जुन्या चिमणीवर चालू गळीत हंगाम सुरू करण्यासाठी प्रयत्न चालू असल्याने शेतकऱ्यांनी घाबरण्याचे कारण नाही. नोंदविलेला ऊस घाईने इतर कारखान्यांना न देता सिध्देश्वर कारखान्याकडेच गाळपासाठी पाठवावा, असे आवाहन सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे मार्गदर्शक संचालक धर्मराज काडादी यांनी केले.



गेल्या महिन्यात महापालिकेने सिध्देश्वर साखर कारखान्याच्या चिमणीचे पाडकाम केले. त्यामुळे २०२३-२४ चा गळीत हंगाम चालू करण्यासाठी येणाऱ्या अडचणींवर तोडगा काढण्यासाठी आयोजित शेतकरी सभासदांच्या सभेत काडादी बोलत होते.

काडादी म्हणाले, वैयक्तिक द्वेष व सूडाच्या भावनेतून चिमणी पाडली गेली. यामध्ये सभासदांची दिशाभूल करण्याचाही प्रयत्न झाला. होटगी रोड विमानतळाला कारखान्याच्या चिमणीचा अडथळा नव्हताच, असे असताना हा कारखाना कसा बंद पडेल याचे कुटील कारस्थान काही दुष्ट मंडळींनी सातत्याने रचले. माजी प्रतिमा मलीन करण्याचा वेळोवेळी प्रयत्न झाला. कारखाना व सभासदांचे हीत पाहूनच सहवीजनिर्मिती प्रकल्प उभारणीचे काम थांबवले नाही. सभासदांच्या हितासाठीच हे सर्व काही केल्याचे काडादी यांनी सांगितले.

आता २०२३-२४ चा गाळप हंगाम सुरु करण्यासाठी कामगार कामाला लागले आहेत. त्याचबरोबर वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, थरमॅक्स कंपनी आणि सहवीजनिर्मितीच्या तंत्रज्ञांनी कारखान्यास भेट देवून कारखाना लवकर सुरु करण्यासाठी मार्गदर्शन केले आहे. यापुढे नवीन चिमणी उभारण्यासाठी, एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडिया, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महापालिकेकडून परवानगी मिळवावी लागेल. चिमणी उभारणीस परवानगी मिळाल्यानंतर पर्यावरणीय अनुकूलताही येणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. यावेळी व्यासपीठावर कारखान्याचे अध्यक्ष पुष्कराज काडादी, ॲड. दीपक आलुरे, भगवानराव भोसले, अमोल हिप्परगी, संजीवकुमार पाटील, आनंद तानवडे, सुरेश हसापुरे, इंदूमती अलगोंड-पाटील, अंबण्णप्पा भंगे, हरीश पाटील, विजयकुमार हत्तुरे, राधाकृष्ण पाटील, प्रा. व्ही. के. पाटील, शरणराज काडादी, अण्णाराव याबाजी यांच्यासह सभासद उपस्थित होते.

### स्वामी समर्थ कारखाना चालविण्यास देण्याची तयारी

दहिटणे येथील स्वामी समर्थ कारखाना आपल्याला चालविण्यासाठी देण्याची तयारी माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांनी दर्शविली आहे. तसेच कर्नाटकातील इतर कारखानदारही सिध्देश्वर'चा ऊस गाळपासाठी घेण्याची तयारी दाखविली आहे. त्यामुळे सभासदांनी घाबरुन न जाता अन्य कारखान्यांना ऊस घालविण्यासाठी गडबड करु नये. असे आवाहन काडादी यांनी केले.

### चिमणी पाडण्याचा न्यायालयाचा आदेश नाही

भाजप सरकार सत्तेवर आल्यापासून कारखान्याला त्रास सुरु झाला. कोर्टाच्या आदेशानेच चिमणी पाडली त्यामागे भाजप नसल्याचे आमदार सुभाष देशमुख म्हटले होते. त्याचा खरपूस समाचार घेताना काडादी यांनी कोर्टाने कुठेही चिमणी पाडा असा उल्लेख केला नाही. तसा उल्लेख असल्याचे देशमुख यांनी दाखवून द्यावे. उलट चिमणी पाडण्याचा ठराव करण्यासाठी भाजपने महापालिकेत व्हीप जारी केला होता. सोलापूरच्या दौऱ्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चिमणीवरील कारवाई अंतिम टप्प्यात असून सोलापूरच्या मनासारखे होईल असे म्हटले होते. तीन-चार प्रतिनिधींचे मत म्हणजे सोलापूरकरांचे मत असू शकत नाही, असे काडादी यांनी सांगत देशमुख यांनी आतातरी पुढील परवाने मिळून देण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले.